# आकाशवाणी पुणे

## प्रादेशिक वृत्त विभाग

## पुणे वृत्तांत

## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.11.2025** **वार- रविवार**

---

**एनडीए**

तंत्रज्ञानात वेगानं बदल होत असून या बदलत्या जगाला सामोरं जाण्यासाठी आत्मविश्वास, धैर्य आणि शिस्त हे तीन सद्गुण यशस्वी होण्यासाठी उपयोगी पडतील, असं प्रतिपादन नौदल प्रमुख ऍडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी केलं. पुण्यातल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी म्हणजेच एनडीएच्या 149 व्या तुकडीचा दीक्षांत संचलन सोहळा आज सकाळी प्रबोधिनीच्या खेत्रपाल मैदानात पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. छात्र सिद्धार्थ सिंग यानं या संचलनाचं नेतृत्त्व केलं. यावेळी राष्ट्रपती सुवर्ण पदक दीपक कांडपाल, रौप्य पदक सिद्धार्थ सिंग आणि कास्य पदक सिद्धी जैन यांना प्रदान करण्यात आलं. यावेळी प्रबोधिनीचे कमांडंट व्हाइस ऍडमिरल अनिल जग्गी उपस्थित होते.

**नदी स्वच्छता**

नदी स्वच्छता हा केवळ एक उपक्रम नाही, तर पुणेकर नागरिकांसाठी महापालिकेच्या माध्यमातून तयार झालेलं स्वच्छतेचं व्यासपीठ आहे असं मत पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी व्यक्त केलं आहे. पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा आणि पर्यावरण विभागातर्फे नदी महोत्सव स्वच्छ नदी, सुंदर पुणे या उपक्रमांतर्गत आज सकाळी शहरातील नद्यांची स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी आयोजित कार्यक्रमात आयुक्त बोलत होते. या मोहिमेत विविध महाविद्यालये, नागरिक, स्वयंसेवी

संस्था, कंपन्या आणि महापालिकेच्या विविध विभागांनी सहभाग नोंदविला. या मोहिमेतून 11 टनापेक्षा अधिक कचरा गोळा करण्यात आला.

**<u>पिंपरी चिंचवड</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेनं सार्वजनिक स्वच्छता नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध धडक कारवाई सुरू ठेवली आहे. या कारवाईत या महिन्यात आता पर्यंत 28 लाख 12 हजार 200 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

**<u>पुणेमनपा</u>**

पुणे महापालिकेनं मिळकत कर थकबाकीदारांसाठी 15 नोव्हेंबरपासून सुरू  केलेल्या अभय योजनेद्वारे गेल्या 15 दिवसांत 11 हजार मिळकतधारकांनी 65 कोटी 41 लाख रुपयांचा मिळकत कर भरला आहे. आतापर्यंत  अभय योजनेमुळं  72 कोटी 82 लाख रुपयांचं  उत्पन्न मिळालं आहे. मिळकत कर विभागाचं 2025-26 या आर्थिक वर्षात 3 हजार कोटींचं उद्दिष्ट असून आतापर्यंत 1 हजार 800 कोटींचा महसूल जमा झाला आहे.

**<u>लोकअदालत</u>**

आगामी राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये 13 डिसेंबरला  न्यायालयामध्ये होणारी संभाव्य गर्दी आणि नागरिकांची गैरसोय टाळण्याकरीता 1 नोव्हेंबर पुर्वी न्यायालयात दाखल असलेल्या ज्या प्रकरणांमध्ये लोकअदालतीची नोटीस काढण्यात आली आहे, केवळ अशीच प्रकरणे लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आलेली आहेत. तसेच ज्यांना 13 सप्टेंबर रोजीच्या लोकअदालतीच्या दिवशी टोकन मिळाली आहेत त्यांची देखील प्रकरणे या लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आलेली नाहीत, तसंच कोणाचीही मोटार वाहन प्रकरणे लोकअदालतीत ठेवण्यात आलेली नाहीत याची नोंद घ्यावी,असे आवाहन पुणे जिल्हा विधी सेवा

प्राधिकरण,पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड वाहतुक विभाग तसंच महामार्ग वाहतूक विभाग पुणे यांच्यातर्फे करण्यात आलं आहे.

**<u>सीटीईटी</u>**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या म्हणजेच सीबीएसई तर्फे घेण्यात येणारी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा येत्या आठ फेब्रुवारीला घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून, इच्छुक उमेदवारांना 18 डिसेंबरपर्यंत अर्ज भरता येतील. ऑनलाईन अर्ज आणि परीक्षा शुल्क भरण्यासाठी सीटीईटी डॉट एनआयसी डॉट इन (https://ctet.nic.in) या संकेतस्थळाला भेट द्यावी असं सीबीएसईनं कळवलं आहे.

**<u>एसटी</u>**

शालेय सहलीच्या स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाचा आनंद घेण्यासाठी एसटी महामंडळ नवीन बस उपलब्ध करून देणार आहे. तसंच नेहमीप्रमाणे एकंदर भाड्यामध्ये 50 टक्के सवलत मिळणार आहे. यंदा राज्यातील 251 आगारांमधून 800 ते एक हजार बस उपलब्ध करून देण्याचं नियोजन करण्यात आल्याचं पुणे एसटी विभाग नियंत्रक अरुण सिया यांनी सांगितलं.

**<u>पुरस्कार</u>**

पुण्यातील कथक नृत्यांगना श्रद्धा मुखडे हिला नृत्यगुरू पंडित बिरजू महाराज युवा पुरस्कारानं गौरविण्यात आलं आहे. दिल्लीतल्या पंडित बिरजू महाराज कलाश्रमतर्फे देशपातळीवर घेण्यात आलेल्या नृत्य स्पर्धेत कथक गुरू मंजुश्री चॅटर्जी आणि डॉक्टर पद्मश्री शोभना नारायण यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**<u>समर्थपादुकादौरा</u>**

समर्थ रामदास स्वामींच्या विचारांचा  प्रचार आणि प्रसार करण्याच्या हेतूनं सज्जनगडच्या रामदास स्वामी संस्थानच्यावतीनं आयोजित  केला जाणारा समर्थ पादुकांचा दौरा पुणे शहरात उद्या एक डिसेंबर पासून 31 डिसेंबर पर्यंत होणार आहे. या दौऱ्यातील पहिला  टप्पा उद्यापासून आठ डिसेंबर पर्यंत श्रीगणेश मंगल केंद्र नवी सांगवी इथं असणार  आहे.

**बाजार**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह अन्य राज्यातून सुमारे शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक वाढल्यानं  टोमॅटो, मटार, बटाटा आणि घेवडा यांच्या भावात घसरण झाली. तर मागणी वाढल्याने ढोबळी मिरचीच्या भावात किंचित वाढ झाली. पालेभाज्यांचे भाव स्थिर आहेत. फळबाजारात कलिंगड, डाळिंब या फळांना मागणी वाढल्यानं भावात वाढ झाली आहे. दत्तजयंती उत्सव आणि लग्नसराईचा हंगाम सुरू झाल्यानं फुल बाजारात शोभिवंत फुलांची मागणी वाढली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 9 पूर्णांक 8 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. उद्याही किमान तापमानात फारसा बदल संभवत नाही, अशी शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.

-------

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**